


| वर्ष - 7 | अंक - 236 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- न्यूलँड्सच्या खेळपट्टीवरही भेगा
- जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष
- मी फक्त उभं राहून टाळ्या वाजवू का?
- अजून मी आठ महिने मुख्यमंत्री आहे


www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 5 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# खासदार श्रीरंग बारणेंपुढे पेच?

## आमदार अण्णा बनसोडे : पार्थ पवारांना महायुतीची उमेदवारी द्या!

। पिंपरी ।महाईन्यूज ।।

शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्या मावळ लोकसभेच्या उमेदवारीवरून महायुतीमध्ये आरोप- प्रत्यारोप होताना दिसत आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार सुनील शेळके यांनी बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला असून त्यांनी गेल्या नऊ वर्षात काय विकास कामे केली आहेत, ती अगोदर समोर ठेवावीत आणि मग निवडणुकीला सामोरे जावे असे थेट आव्हान त्यांनी केले आहे. तर, पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून पार्थ पवार यांना उमेदवारी देण्यात यावी, ते निश्चित निवडून येतील असा विश्वास व्यक्त केला आहे. यामुळे शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्यापुढील पेच आणखी वाढला आहे. अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष मावळ लोकसभा मतदार संघावर आहे. राज्यामध्ये भाजप, शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यात महायुती आहे. परंतु, या महायुतीचा धर्म केवळ अजित पवार गटानेच पाळायचा का?

(पान २ वर)




# महाविकास आघाडीचा फॉर्मुला तयार

## आम्ही राज्यात 41 जागा जिंकू, नाना पटोलेंचा दावा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।




**महाविकास आघाडीमध्ये (MVA ) कोणताही वाद नाही. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी (LOK SABHA ELECTION 2024) आमचा फॉर्मुलाही तयार झालाय. लवकरच याबाबतचा निर्णय जाहीर करु, असे सांगतानाच काँग्रेस नेते नाना पटोले (NANA PATOLE) यांनी राज्यात महाविकास आघाडी 40 पेक्षा जास्त जागा जिंकेल असा विश्वास व्यक्त केलाय.**

ते पुण्यात बोलत होते. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकाही केली. शेतकरी विरोधातलं केंद्र आणि राज्यातील सरकार आहे. निवडणूक आयोगाचे नियुक्त करण्याचे अधिकार केंद्राकडे घेतले आहेत. त्यामुळे आता निवडणुका सुद्धा पारदर्शी राहतील का नाही? हा प्रश्न निर्माण झालाय, असेही नाना पटोले म्हणाले. मणिपूर ते मुंबई, अशी न्याय यात्रा सुरु होणार आहे. उद्याची (गुरुवारी) दिल्लीची बैठक राहुल गांधी यांची यात्रा सुरू होत आहे त्यासाठी आहे. त्यावेळी राज्यातील परीस्थितीचा आढावा दिला जाईल, असे नाना पटोले यांनी सांगितलं. भाजपच्या ट्विटमध्ये प्रभू रामांना छोटं आणि मोदींना मोठे दाखवलं जातंय, नेमकी काय चालल आहे हे कळायला तयार नाही. देव मोठा की माणूस? काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी भाजपवर निशाणा साधला. 22 तारखेला काहीच नाही, रामनवमी नाही, त्यांना निवडणुका करायच्या आहेत, म्हणून आता करत आहेत, असे पटोले म्हणाले. मला पक्षाने आदेश दिला तर मी लोकसभा लढेल, माझा निर्णय नाही. पक्ष ठरवेल, असे नाना पटोले यांनी सांगितलं. एक जानेवारीला शरद पवार यांचा फोन आला होता. आपण बसून बोलू असे ते म्हणले. दिल्लीत सर्व प्रमुख नेत्यांना घेऊन बैठक घेऊ. पवार साहेबांचां मेसेज दिल्लीत खरगे, गांधी यांना देणार आहे. आम्ही वंचितबाबत सकारात्मक आहे.सर्वांना सोबत घेऊ जाणार असल्याचेही पटोले म्हणाले. प्रकाश आंबेडकरांसदर्भात मला शरद पवार यांचा फोन आला होता. आंबेडकर आणि माझी भेट झाल्याचे पवार यांनी सांगितले आणि त्यांच्या महाविकास आघाडीतील समावेशाबाबत निर्णय घेण्याबद्दल विचारले. यावर मी शरद पवारांना इंडीया आघाडीच्या दिल्लीतील बैठकीत निर्णय घेऊ म्हटलंय. आम्ही वंचितला सोबत घेण्याबद्दल सकारात्मक आहोत. समृध्दी मार्गावर रोज अपघात होत आहेत. अनेक जणांचा अपघाती मृत्यू होतोय. या रस्त्यात डिफॉल्ट आहे. त्यात जे केमिकल वापरायचे असतात ते वापरले नाही, ते महाग होते म्हणून. टायर गरम होतात म्हणून ते अपघात होतात. सरकारमध्ये बसलेल्या लोकांची समृध्दी झाली आहे, असे पटोले म्हणाले. मणिपूर ते मुंबई, अशी न्याय यात्रा सुरु होणार आहे. उद्याची (गुरुवारी) दिल्लीची बैठक राहुल गांधी यांची यात्रा सुरू होत आहे त्यासाठी आहे. त्यावेळी राज्यातील परीस्थितीचा आढावा दिला जाईल, असे नाना पटोले यांनी सांगितलं. भाजपच्या ट्विटमध्ये प्रभू रामांना छोटं आणि मोदींना मोठे दाखवलं जातंय, नेमकी काय चालल आहे हे कळायला तयार नाही. देव मोठा की माणूस? काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी भाजपवर निशाणा साधला. 22 रामनवमी नाही, त्यांना निवडणुका करायच्या आहेत, म्हणून आता करत आहेत, असे पटोले म्हणाले.

### मला शरद पवार यांचा फोन आला

मणिपूर ते मुंबई, अशी न्याय यात्रा सुरु होणार आहे. उद्याची (गुरुवारी) दिल्लीची बैठक राहुल गांधी यांची यात्रा सुरू होत आहे त्यासाठी आहे. त्यावेळी राज्यातील परीस्थितीचा आढावा दिला जाईल, असे नाना पटोले यांनी सांगितलं. भाजपच्या ट्विटमध्ये प्रभू रामांना छोटं आणि मोदींना मोठे दाखवलं जातंय, नेमकी काय चालल आहे हे कळायला तयार नाही. देव मोठा की माणूस? काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी भाजपवर निशाणा साधला. 22 तारखेला काहीच नाही, रामनवमी नाही, त्यांना निवडणुका करायच्या आहेत, म्हणून आता करत आहेत, असे पटोले म्हणाले. मला पक्षाने आदेश दिला तर मी लोकसभा लढेल, माझा निर्णय नाही. पक्ष ठरवेल, असे नाना पटोले यांनी सांगितलं. एक जानेवारीला शरद पवार यांचा फोन आला होता. आपण बसून बोलू असे ते म्हणले. दिल्लीत सर्व प्रमुख नेत्यांना घेऊन बैठक घेऊ. पवार साहेबांचां मेसेज दिल्लीत खरगे, गांधी यांना देणार आहे. आम्ही वंचितबाबत सकारात्मक आहे.सर्वांना सोबत घेऊ जाणार असल्याचेही पटोले म्हणाले. प्रकाश आंबेडकरांसदर्भात मला शरद पवार यांचा फोन आला होता.

# पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प

## उगमापासूनच प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने हालचाली केल्या सुरु

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना, इंद्रायणी आणि मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आता उगमापासूनच प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. पिंपरी महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जिल्हा प्रशासन, ग्रामस्थांच्या पुढाकारातून नदीकाठच्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचे नियोजन केले आहे. पुढील दोन वर्षांत ही प्रक्रिया मार्गी लागून नदी प्रदूषण रोखण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.**



औद्योगिकनगरी तीन नद्यांच्या खोऱ्यात आहे. शहराच्या उत्तरेकडून इंद्रायणी, दक्षिणेकडून मुळा आणि मध्यातून पवना नदी वाहते. मुळा व पवनेचा संगम जुनी सांगवी येथे झाला आहे. संगमापासून पुढे मुळा नावाने नदी ओळखली जाते. मुळा नदीचा उगम मुळशी तालुक्यात असून, शहरातील पात्र पुणे महापालिकेच्या हद्दीत आहे. केवळ उत्तरेकडील काठ पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे आहे. पवना व इंद्रायणी नद्यांचा उगम मावळ तालुक्यात आहे. मामुर्डी येथून पवना नदी शहरात प्रवेश करते. इंद्रायणी नदीचे पात्र महापालिकेकडे असून, उत्तर काठ 'पीएमआरडीए'च्या हद्दीत आहे. या दोन्ही नद्यांचे शहराच्या हद्दीतील पुनरुज्जीवन महापालिका करीत आहे. तर मुळा नदीचे पुनरुज्जीवन पुणे महापालिकेच्या सहकार्याने केले जाणार आहे. मात्र, नद्यांच्या उगमापासून शहराच्या हद्दीपर्यंतही मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे आढळून आले आहे. औद्योगिक वसाहती, नदीकाठच्या कारखान्यांतील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट पवना, इंद्रायणी नदीपात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी नद्यांना प्रदूषित करत आहे. यातील काही गावांत ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर परिषद, देहूरोड कटक मंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आहे. काही गावांचा समावेश 'पीएमआरडीए'मध्ये झालेला आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून नद्यांच्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याची सूचना राज्य शासनाने केली होती. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. लोणावळा, तळेगाव दाभाडे, आळंदी नगर परिषद, देहू, वडगाव नगरपंचायत, देहूरोड कटक मंडळ, कुसगाव बुद्रुक, कामशेत-खडकाळे, इंदुरी ही १५ हजारांपेक्षा अधिक लोकसंख्येची, तर कार्ला, वरसोली, कान्हेवाडी, येलवडी, आंबी, जांभूळ, कान्हे, गोळेगाव, सोळू, तुळापूर, मरकळ, नाणे, टाकवे बुद्रुक, सांगुर्डी, वडगाव शिंदे या १५ हजारांपेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार आहेत.

### बारणेंपुढे पेच?

पान १ वरून

असा प्रश्न उपस्थित करत सुनील शेळके यांनी श्रीरंग बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला आहे. श्रीरंग बारणे यांनी गेल्या नऊ वर्षांत मावळ लोकसभा मतदारसंघात काय काम केले आहे? यासंबंधी त्यांनी उत्तर द्यावं, असं म्हटलं आहे. मावळ लोकसभा उमेदवारीवर राष्ट्रवादी अजित पवार गटाने दावा केला आहे. दुसरीकडे पिंपरी विधानसभा अजित पवार गटाचे आमदार अण्णा बनसोडे यांनी देखील पार्थ पवारसाठी 'ती' जागा सोडण्यात यावी असं म्हटलं आहे. पार्थ पवार यांनी या अगोदर देखील मावळ लोकसभा निवडणूक लढवली होती. आता त्यांना अधिक अनुभव असून त्यांनी निवडणूक लढवल्यास ते निश्चितच निवडून येतील, असा विश्वास आमदार अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

# ‘कॉन्स्ट्रो एक्स्पो’मुळे पुण्याच्या लौकीकात भर!

## शहराच्या विकासामध्ये बांधकाम क्षेत्राचा वाटा : राहुल महिवाल

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**‘कॉन्स्ट्रो’ एक्स्पोमुळे पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगराच्या लौकिकात भर पडत आहे. चीन आणि इतर देशांपेक्षा अधिक चांगल्या सुविधा, तंत्रज्ञान आपल्याकडे आहेत, आपण जागतिक स्पर्धेत सरस असल्याचे अशा प्रदर्शनांमधून दिसून येते, असे मत पुणे महानगर आयुक्त राहुल महिवाल यांनी व्यक्त केले.**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) मोशी येथील अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र (पीआयईसीसी) येथे कॉन्स्ट्रो 2024 या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे 4 ते 7 जानेवारी 2024 दरम्यान आयोजन केले आहे. पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल यांच्या हस्ते गुरुवारी या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. व्हर्च्यूअल कॉन्स्ट्रो प्रदर्शनाचेही यावेळी उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. वास्तू विशारद विलास अवचट, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे, ‘कॉन्स्ट्रो’चे अध्यक्ष जयंत इनामदार, पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनीरिंग अँड रिसर्च फौंडेशनचे (पीसीईआरएफ) अध्यक्ष नरेन कोठारी, सचिव शिरीष केंभवी, संजय वायचळ आदी उपस्थित होते. राहुल महिवाल म्हणाले, पुणे महानगर क्षेत्रात पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यात पीएमआरडीएचा रिंग रोड, नदी सुधार, माण-शिवाजीनगर मेट्रो यासह विविध प्रकल्पांचे काम सुरू आहे. यात बांधकाम क्षेत्राचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे बांधकाम क्षेत्रातील संशोधन, नवतंत्रज्ञान, कार्यप्रणाली याची सांगड घालणे आवश्यक आहे. कॉन्स्ट्रो प्रदर्शन त्यासाठी मैलाचा दगड ठरत आहे.

> “ अभियांत्रिकी क्षेत्रातील विद्यार्थी, व्यावसायिक आणि उद्योगांना एकाच छताखाली आणण्याचे काम कॉन्स्ट्रोच्या माध्यमातून केले आहे. बांधकाम उद्योगातील अद्ययावत यंत्रसामग्री, साहित्य, पद्धती आणि तंत्रज्ञान प्रदर्शनात आहे. ‘लेटेस्ट मेथड अॅण्ड टेक्नॉलॉजी’ ही यंदाच्या प्रदर्शनाची संकल्पना आहे.
>
> **- जयंत इनामदार,** अध्यक्ष, कॉन्स्ट्रो.

> “ कॉन्स्ट्रो इंटरनॅशनल एक्स्पोची ही 18 वी मालिका आहे. 30 हजार चौरस मीटर जागेवर हे प्रदर्शन भरवले आहे. पीसीईआरएफ यांच्यातर्फे आयोजित प्रदर्शनात पीएमआरडीए कन्सेप्ट पार्टनर तर पिंपरी-चिंचवड महापालिका सहयोगी भागीदार आहेत.
>
> **- नरेन कोठारी,** अध्यक्ष, पीसीईआरएफ.

# आव्हाडांचे वक्तव्य विकृत मानसिकता!

## श्रीरामांवरील भाष्याच्या निषेधार्थ भाजपाचे आंदोलन

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**देशभरात अयोध्येतील प्रभू श्रीराम जन्मभूमी येथे भव्य मंदिर लोकार्पण आणि श्रींची मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. त्यासाठी देशभरात दिवाळी-उत्सव साजरा केला जात आहे.**




असे असताना विघ्नसंतुष्ट लोकांकडून तमाम हिंदूंचे आदर्श व श्रद्धस्थान प्रभू श्रीराम यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य करुन शुभकार्यात ‘मिठाचा खडा’ टाकण्याचे काम राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड करीत आहेत, अशी घणाघाती टीका भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केली. “शिकार करून खाणारा राम हा बहुजनांचा आहे. रामाचा आदर्श सांगून शाकाहार थोपवला जात आहे. १४ वर्षे जंगलात राहणारा राम शिकार करायचा. रामाने १४ वर्षे वनवास भोगला, मग तो शाकाहारी कसा असू शकतो?” अशी वादग्रस्त मुक्ताफळं राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी उधळली. त्याविरोधात शहर भाजपाच्या वतीने आक्रमक भूमिका घेताना जितेंद्र आव्हाड यांचा निषेध करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, पिंपरी येथे आंदोलन केले. यावेळी आव्हाड यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, पिंपरी विधानसभा निवडणूक प्रमुख अमित गोरखे, वरिष्ठ उपाध्यक्ष तथा पक्ष प्रवक्ते राजू दुर्गे, उपाध्यक्ष सिद्धेश्वर बारणे, आशा काळे, रवी देशपांडे, विनोद मालू, सरचिटणीस संजय मंगोडेकर, शैला मोळक, नामदेव ढाके, महिला मोर्च्याच्या सरचिटणीस वैशाली खाडये, युवा मोर्च्याचे अध्यक्ष तुषार हिंगे आदी उपस्थित होते. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप म्हणाले की, जितेंद्र आव्हाड हे सातत्याने सनातन धर्मावर टीका करतात. सनातन धर्मावर टीका करून कुणाची खुष्मस्कारी करतात, हे वेगळे सांगायची गरज नाही. मुद्दाम सनातन धर्माविषयी बेताल वक्तव्ये करणे, त्यातून वाद निर्माण करणे, समाज-समाजामध्ये तणाव वाढविताना आपली पोळी भाजून घेणे यासाठीच जितेंद्र आव्हाड प्रसिद्ध आहेत. त्यांनी यापूर्वी देखील अनेकदा अशी निराधार वक्तव्ये त्यांना भोवली आहेत.

> “ भव्य राममंदिराचे निर्माण होत असताना, अशा प्रकारची वादग्रस्त वक्तव्ये करून आमच्या भावना दुखाविण्याचे दुष्कर्म जितेंद्र आव्हाड सातत्याने करत आहेत. प्रत्येक वेळेस अशा प्रकाराची वादग्रस्त वक्तव्ये करून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण करत आहेत. त्यांच्या या वक्तव्यांवर महाविकास आघाडीचे नेते देखील मौन बाळगून आहेत. भारतीयांचे श्रद्धास्थान असलेले प्रभू श्रीराम यांच्याबाबत बेताल बोलणे, अशा विकृत विचारसरणीला वेळीच लगाम घातला पाहिजे.
>
> **- शंकर जगताप,** भाजपा, शहराध्यक्ष, पिंपरी-चिंचवड.

# खाडे यांची डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या मंडळावर नियुक्ती

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भाजपाचे ज्येष्ठ नेते सदाशिव खाडे यांची पुणे, लोहगाव येथील अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ नियामक मंडळाच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव अजित काटकर यांनी ३ जानेवारी रोजी तसे पत्र विद्यापीठाचे कुलसचिव आणि सदाशिव खाडे यांना दिले आहे. या पत्रात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठाच्या नियामक मंडळावर राज्य शासनाने नामनिर्देशित सदस्य म्हणून सदाशिव खाडे यांची नियुक्ती केली आहे.

सदाशिव खाडे हे पिंपरी चिंचवड शहरातील भाजपाचे ज्येष्ठ निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे ते कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. खाडे यांनी यापूर्वी राज्यमंत्री पदाचा दर्जा असणाऱ्या पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून देखील काम पाहिले आहे. त्यांच्या कार्यकाळात १४ हजार घरांचे नियोजन करून ६ हजार घरांचे वाटप करण्यात



आले आहे. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र केंद्राचे काम, प्रशस्त रस्ते, मोठी उद्याने असे प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात विकसित झाले आहेत. तसेच प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळ, पिंपरी चिंचवड वृक्ष प्राधिकरण समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ समिती वर त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे.

सध्या मावळ लोकसभा मतदारसंघाचे ते संयोजक आणि महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी कार्यकारणी सदस्य पदी कार्यरत आहेत. राजकारण, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात देखील त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे. यामध्ये गजलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था, ब्रह्मचैतन्य फाउंडेशन, साकोसा मित्र मंडळ तसेच भटके,विमुक्त परिषदेत देखील ते काम पाहत आहेत. खाडे यांच्या निवडीमुळे पिंपरी चिंचवड भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.




# हिवाळी अधिवेशनाच्या दहा दिवसांचे फलित

**विधिमंडळाच्या यंदाच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज गतवर्षीप्रमाणेच फक्त १० दिवस झालं. नव्या वर्षातलं पुढचं अधिवेशन विद्यमान सरकारच्या काळातलं अखेरचं असणार. ते अर्थसंकल्पीय अधिवेशन २६ फेब्रुवारी २४ रोजी सुरू होईल, अशी घोषणा झाली आहे.**

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी झालेल्या नागपूर करारानुसार विदर्भातल्या समस्यांची चर्चा, सोडवणूक व्हावी या उद्देशाने विधिमंडळाचं किमान एक अधिवेशन नागपूरला घेतलं जातं. मात्र अलीकडे हिवाळी अधिवेशनांमध्ये विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा होत नाही, असं स्थानिक पत्रकार, सामाजिक संघटना सांगतात. या अधिवेशनात आजवरच्या सर्वाधिक अशा ५५,५२० कोटींच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. अधिवेशनात कामकाजाचा फारसा वेळ वाया गेला नाही. विधानसभेत रोजचं सरासरी कामकाज १० तास ५ मिनिटं चाललं. सदस्यांची सरासरी उपस्थिती ८१.६९% होती. विधान परिषदेचं कामकाज दररोज सरासरी ७ तास ६ मिनिटं चाललं. विधान परिषद सदस्यांची सरासरी उपस्थिती ८२.३६% होती. या अधिवेशनात ती सुमारे ४ टक्क्यांनी घटली. अधिवेशनासाठी एकूण ७,५८१ तारांकित प्रश्न दाखल झाले होते. यापैकी २४७ प्रश्न स्वीकृत आणि ३४ प्रश्न उत्तरित झाले. अशासकीय



ठरावांमध्ये प्राप्त २६३ सूचनांपैकी १८७ मान्य झाल्या. विधानसभेत एकूण २१३ तारांकित प्रश्न चर्चिले गेले. पैकी राज्यनिहाय उपस्थित केलेले ६३ वगळता, उर्वरित १५० प्रश्नांचं जिल्हानिहाय वर्गीकरण असं: सर्वाधिक २७ प्रश्न मुंबई जिल्ह्यातून, त्याखालोखाल ठाणे १८, पालघर १४, पुणे १०, नाशिक व रायगड जिल्ह्यातून प्रत्येकी ८ प्रश्न मांडले गेले. अमरावती, नागपूर प्रत्येकी ७, चंद्रपूर ६, बुलढाणा ५, गडचिरोली, गोंदिया, जळगांव, रत्नागिरी, यवतमाळ प्रत्येकी ३ प्रश्न. औरंगाबाद, बीड, भंडारा, कोल्हापूर, लातूर, नांदेड, नंदुरबार, सांगली प्रत्येकी २ आणि अहमदनगर, अकोला, हिंगोली, जालना, परभणी, सातारा, सिंधुदुर्ग, वर्धा, वाशिम जिल्ह्यांतून प्रत्येकी १ प्रश्न उपस्थित झाला. धुळे, उस्मानाबाद, सोलापूर व भुसावळ या जिल्ह्यांतून एकही तारांकित प्रश्न आला नाही. विधान परिषदेत एकूण ४१८ तारांकित प्रश्न आले. पैकी राज्यनिहाय उपस्थित केलेले १४४ वगळता, उर्वरित २७४ प्रश्नांचं जिल्हानिहाय वर्गीकरण असं: सर्वाधिक ५७ प्रश्न मुंबई जिल्ह्यातून, त्याखालोखाल ठाणे २४, रायगड १७, पालघर, औरंगाबाद, नागपूर प्रत्येकी १६, अकोला व पुणे प्रत्येकी १०, सातारा ९, वर्धा ८, हिंगोली, नंदुरबार, सांगली व सोलापूर प्रत्येकी ७ प्रश्न उपस्थित झाले. तर अहमदनगर, अमरावती व जळगावमधून प्रत्येकी ६, उस्मानाबाद व रत्नागिरीतून प्रत्येकी ५ प्रश्न आले. चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ या जिल्ह्यांतून प्रत्येकी ४, बीड, बुलढाणा, नांदेड, परभणी, सिंधुदुर्ग प्रत्येकी ३ प्रश्न चर्चिले गेले. जालना, कोल्हापूर, लातूर प्रत्येकी २ तर भंडारा, नाशिक प्रत्येकी १ प्रश्न चर्चेस आला. धुळे, गोंदिया, वाशिम व भुसावळ मधून एकही प्रश्न आला नाही. संपर्कच्या अभ्यास विषयांपैकी विधानसभेत आरोग्यावर ३०, शिक्षणावर १६, महिला-बालक विषयावर प्रत्येकी १० प्रश्न आणि विधान परिषदेत आरोग्यावर २८, शिक्षणावर ३५, महिलाविषयक १७ तर बालकांसंबंधी ४ प्रश्न उपस्थित झाले. कोविडोत्तर अधिवेशनांमध्ये आरोग्यविषयक प्रश्नसंख्येत वाढ झाली असली, तरी या कळीच्या विषयांवर उपस्थित केलेल्या प्रश्नांची सरासरी टक्केवारी जेमतेम सात ते आठ टक्केच भरते. ही काळजीची बाब आहे. १९९३ पासून शासकीय दारूबंदी लागू असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनमंत्री धर्मराव बाबा आत्राम यांच्या हस्ते मोहफुलापासून दारूनिर्मितीच्या कारखान्याचं भूमिपूजन अधिवेशन काळातच आयोजित केलं गेलं. म्हणजे, सरकारच्या धोरणविरोधी सरकारचीच कृती. तीही आदिवासीविरोधी. या विरोधात संघटनांनी आणि काही आमदारांनीही आवाज उठवल्यावर उपमुख्यमंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन करून सरकारकडून दारूबंदीविरोधी कोणतीही कृती केली जाणार नाही असं आश्वासन दिलं. राज्यातल्या तातडीच्या गंभीर समस्यांची तड लावण्यासाठीचं आयुध म्हणजे लक्षवेधी सूचना. अधिवेशनात एकूण २,४१४ प्राप्त सूचनांपैकी ३३७ सूचना स्वीकृत झाल्या.

## संपादकीय »

### ‘बाबू’काल!

***सर्व महापालिकांचा कारभार लोकप्रतिनिधींच्या हातून सरकारी सेवकांहाती गेला तरी त्याचे कोणास काही वाटत असल्याचे चित्र नाही.***

नव्या वर्षांत महाराष्ट्रात एक नवाच विक्रम रचला जात असल्याचे दिसते. तीन दिवसांपूर्वी १ जानेवारीस २०२४ हे नवे वर्ष सुरू झाले आणि त्या मुहूर्तावर राज्यातील सर्व शहरे ‘लोकप्रतिनिधी मुक्त’ झाली. गेल्या वर्षांच्या अखेरच्या सप्ताहात राज्यातील शेवटच्या लोकप्रतिनिधींचा समावेश असलेल्या दोन महापालिका आचके देत लोकशाहीपासून मुक्त झाल्या. म्हणजे त्या महापालिकांवरही राज्य सरकारने प्रशासक नेमले. या बाबत सर्वकालीन सत्य म्हणजे हे असे प्रशासक हे सर्वसाधारणपणे त्यांस नेमणाऱ्यांच्या हातचे बाहुले असतात. ती तशी व्हावी ही सर्वपक्षीय सत्ताधाऱ्यांचीही इच्छा नाही. असे असल्यामुळे राज्यातील सर्वच्या सर्व, म्हणजे जवळपास दोन डझनांहून अधिक महापालिकांचा कारभार लोकांतून निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या हातून मंत्रालयांतून नेमल्या जाणाऱ्या सरकारी सेवकांहाती गेला तरी त्याचे कोणास काही वाटत असल्याचे चित्र नाही.

**कोणताही कायदा करताना, त्याचे संबंधित घटकांवर काय परिणाम होऊ शकतील, याचा सारासार विचार केला नाही तर काय होते, ते वाहतूकदारांच्या आंदोलनातून दिसते आहे. त्यामुळेच या कायद्याच्या अंमलबजावणीला चाप लावणे सरकारला भाग पडले.**

# सरकारचे एक पाऊल मागे..!

या संपात इंधन वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकांचाही सहभाग असल्यामुळे अनेक ठिकाणी पेट्रोलची आणि गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाली आणि एकूणच दळणवळण ठप्प होण्याची वेळ आली. सामान्यांना या संपाची झळ बसू लागल्याने सरकारला वाहतूकदारांच्या संघटनेशी चर्चा करणे आणि त्यांचे म्हणणे मान्य भाग पडले. वाहतूकदारांचे म्हणणे समजून न घेता, केंद्र सरकारने भारतीय न्यायसंहितेमध्ये केलेल्या तरतुदींमुळे वाहनचालक संतप्त झाले होते. हा नवा कायदा मंजूर झाला असून, त्यास राष्ट्रपतींनीही मंजुरी दिली आहे. आता त्यामध्ये बदल करणे आवश्यक ठरणार आहे. रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांस जबाबदार असणाऱ्या वाहनचालकांवर अतिशय कडक कारवाई करण्यासाठी या नव्या कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. एका बाजूला या वाहनचालकांच्या बेदरकारपणे वाहन चालवण्यामुळे अनेकदा निष्पापांना मृत्यूला सामोरे जावे लागते.



कोणत्याही महामार्गावरील वाहतुकीची गती मोठया वाहनांमुळे मंदावते, हा नेहमीचा अनुभव. अपघात होताच वाहनचालक वाहन सोडून पळून जाण्याचा प्रकारही नेहमीचाच. देशात रस्त्यांवर होणाऱ्या अपघातांची संख्या वर्षांकाठी सुमारे पावणेपाच लाख, तर अशा अपघातांत बळी जाणाऱ्यांची संख्या सुमारे पावणेदोन लाख एवढी. वाहनचालकांच्या हलगर्जीपणामुळे, मद्यधुंद अवस्थेत अपघातास आमंत्रण देण्यामुळे आणि लहान वाहनांना वाट न देण्याच्या प्रवृत्तीमुळे असे अपघात घडतात, असे निरीक्षण असले, तरी त्याला दुसरी बाजूही आहेच. नव्या कायद्यानुसार गंभीर अपघात झाल्यानंतर वाहनचालकाने पोलीस खात्यास माहिती कळवणे बंधनकारक असून, पोलीस किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यास न कळवता पळून जाणाऱ्या वाहनचालकास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या शिक्षेविरोधात वाहनचालकांनी संपाचे हत्यार उपसून देशभर आंदोलन सुरू केले. अपघात झाल्यानंतर बहुतेक वेळा वाहनचालकास परिसरातील नागरिकांकडून मारहाण केली जाते. काही वेळा ती जीवघेणीही असते. त्यामुळे वाहनचालक अपघातस्थळी थांबत नाहीत. यापुढे हिट अँड रन स्वरूपाच्या गुन्ह्यात १० वर्षांचा तुरुंगवास आणि सात लाख रुपये दंड अशा शिक्षेची तरतूद नव्या कायद्यात करण्यात आली आहे. ही शिक्षा अन्याय्य असल्याचे वाहतूकदारांचे म्हणणे आहे. गुन्हा करणाऱ्यास शिक्षा व्हायला हवी, हे खरे; परंतु गुन्हा आणि त्यासाठीची शिक्षा यांचा अन्योन्यसंबंध असणे आवश्यक असते. त्यामुळे हा कायदा तयार करण्यापूर्वी वाहतूकदारांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या असत्या, तर इतक्या कठोर कारवाईचा विचार कदाचित झाला नसता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अजून मी आठ महिने मुख्यमंत्री आहे

## » आपल्याला खूप फिरावा लागणार : मुख्यमंत्री शिंदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजून मी आठ महिने मुख्यमंत्री आहे, आपल्याला खूप फिरावा लागणार असल्याचे वक्तव्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे (CM EKNATH SHINDE) यांनी केले. मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत पालघर (PALGHAR) जिल्ह्यातील इतर पक्षांमधील कार्यकर्त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर उपस्थितांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. येत्या काही दिवसांत विधानसभा अध्यक्षाकडून आमदार अपात्रतेचा निकाल येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या वक्तव्याला आता महत्त्व आले आहे.**



आज मुंबईतील 'नंदनवन' बंगल्यात काही कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला. शिवसेना शिंदे गटाने पालघर जिल्हयात ठाकरे बंधूंना धक्का दिला आहे. पालघर जिल्ह्यातील उद्धव ठाकरे गट आणि मनसेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्याशिवाय, काँग्रेस पदाधिकारी आणि काही सरपंचांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला. त्याशिवाय, ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांच्या मतदार संघातील वरळी येथील माजी नगरसेविका रत्ना महाले यांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, सरकार काम करत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते प्रवेश करत आहे. 'शासन आपल्या दारी कार्यक्रम' सर्वात लोकप्रिय आहे. राज्यातील 2 कोटी लोकांनी लाभ घेतला आहे. पालघर जिल्ह्यातील विकास ठाणे सारखा झाला पाहिजे यासाठी मी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. आम्ही बंड केलं, त्या दिवशी आमदार श्रीनिवास यांच्या मुलाचा वाढदिवस होता. पण त्यांनी त्यावेळी आधी लग्न कोंढण्याचे आणि नंतर बाकीची कामे, असे म्हटले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मी अजून 8 महिने मुख्यमंत्री असल्याचे वक्तव्य केले. आपल्याला खूप कामे करायची असून बरेच फिरायचे असल्याचे त्यांनी म्हटले. शिवसेना आमदार अपात्रतेची कारवाईची टांगती तलवार असतानाही आपण अपात्र होणार नसल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यातून दिसत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. देशात लोकसभेच्या निवडणुका पार पडणार असून त्यानंतर राज्यात सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये विधानसभेच्या निवडणुका पार पडणार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री म्हणून शिंदे आपला कार्यकाळ पूर्ण करत विधानसभा निवडणुकांना सामोरे जाणार असल्याचीही चर्चा सुरू झाली आहे.

आज मुंबईतील 'नंदनवन' बंगल्यात काही कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला. शिवसेना शिंदे गटाने पालघर जिल्हयात ठाकरे बंधूंना धक्का दिला आहे. पालघर जिल्ह्यातील उद्धव ठाकरे गट आणि मनसेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्याशिवाय, काँग्रेस पदाधिकारी आणि काही सरपंचांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला. त्याशिवाय, ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांच्या मतदार संघातील वरळी येथील माजी नगरसेविका रत्ना महाले यांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, सरकार काम करत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते प्रवेश करत आहे. 'शासन आपल्या दारी कार्यक्रम' सर्वात लोकप्रिय आहे. राज्यातील 2 कोटी लोकांनी लाभ घेतला आहे. पालघर जिल्ह्यातील विकास ठाणे सारखा झाला पाहिजे यासाठी मी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

### सरकार काम करत आहे

» आम्ही बंड केलं, त्या दिवशी आमदार श्रीनिवास यांच्या मुलाचा वाढदिवस होता. पण त्यांनी त्यावेळी आधी लग्न कोंढण्याचे आणि नंतर बाकीची कामे, असे म्हटले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. आज मुंबईतील 'नंदनवन' बंगल्यात काही कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश कार्यक्रम पार पडला. ठाकरे बंधूंना धक्का दिला आहे. पालघर जिल्ह्यातील उद्धव ठाकरे गट आणि मनसेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्याशिवाय, काँग्रेस पदाधिकारी आणि काही सरपंचांनीदेखील शिंदे गटात प्रवेश केला. त्याशिवाय, ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांच्या मतदार संघातील वरळी येथील माजी नगरसेविका रत्ना महाले यांनी देखील शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, सरकार काम करत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते प्रवेश करत आहे. 'शासन आपल्या दारी कार्यक्रम' सर्वात लोकप्रिय आहे. राज्यातील 2 कोटी लोकांनी लाभ घेतला आहे. पालघर जिल्ह्यातील विकास ठाणे सारखा झाला पाहिजे यासाठी मी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले. अजून मी आठ महिने मुख्यमंत्री आहे, आपल्याला खूप फिरावा लागणार असल्याचे वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी केले.

# JN.1 व्हेरियंटचा राज्यात झपाट्याने फैलाव!

## » JN.1 व्हेरियंटची रुग्ण संख्या 110 वर, पुण्यात सर्वाधिक रुग्ण

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील रुग्णसंख्या ही 110 वर पोहचली असल्याची माहिती समोर येतेय. त्यामुळे या व्हेरियंटचा राज्यात झपाट्याने फैलाव होत असल्याचं चित्र आहे. तसेच राज्यात गुरुवार 4 जानेवारी रोजी कोरोनामुळे 2 जणांचा मृत्यू झाला.आज 171 नव्या कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आलीये तर 117 रुग्ण कोरोनामुक्त झालेत.**

पुण्यात या व्हेरियंटचे सर्वाधिक रुग्ण आढळून आलेत. कारण 110 पैकी 91 रुग्ण हे एकट्या पुण्यात आहेत. ठाण्यामध्ये JN.1 व्हेरियंटचे 5 रुग्ण तर बीडमध्ये तीन रुग्ण आढळून आलेत. गुरुवार 4 जानेवारी रोजी कोरोनामुळे दोन जणांचा मृत्यू झाला. सोलापुरातील खाजगी दवाखान्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. या व्यक्तीचे वय हे 73 वर्ष इतके होते. तसेच या रुग्णाला मधुमेह,रक्तदाब आणि दमा या समस्या होत्या, अशी माहिती देण्यात आलीये. या व्यक्तीने कोविड लासिकरणाचे दोन डोस घेतले होते. दरम्यान कोल्हापुरातील एका व्यक्तीचा मृत्यू झालाय. या व्यक्तीचे वय 101 वर्ष होते. तसेच त्या रुग्णाला हृदयरोगाच्या समस्या होत्या. या




व्यक्तीने कोविड लासिकरणाचे डोस घेतले नव्हते. अशी माहिती देण्यात आलीये. कोरोना व्हायरस JN.1 च्या नवीन प्रकारामुळे पुन्हा एकदा चिंता वाढली आहे. कोरोना JN.1 प्रकार हा ओमायक्रॉन व्हेरियंटचा सब-व्हेरियंट आहे. आरोग्य विभागाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, सध्या देशभरात या नवीन JN.1 सब-व्हेरियंटचे 312 रुग्ण आढळले आहेत. यामधील सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये आढळले आहेत. देशातील JN.1 सब-व्हेरियंटच्या एकूण रुग्णांपैकी 47 टक्के प्रकरणे केरळमध्ये आढळल्याने प्रशासन अलर्टवर आहे. आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात सक्रिय कोरोना रुग्णांची संख्या 4,565 वर पोहोचली आहे. भारतात कोरोनाचा नवा JN.1 व्हेरियंट खूप वेगाने पसरताना दिसत आहे. आतापर्यंत दहा राज्यांमध्ये JN.1 सब-व्हेरियंटचे रुग्ण आढळले आहेत. केरळमधून 147, तामिळनाडूतून 22, कर्नाटकातून 8, गोव्यात 51, गुजरातमध्ये 34, महाराष्ट्रात 110 आणि दिल्लीत 16 रुग्णांची नोंद झाली आहे. राजस्थानमध्ये 5, तेलंगणात 2 आणि ओडिशात 1 रुग्ण आढळून आले आहेत.

### आज 171 नव्या बाधितांची नोंद

» जेएन.1 व्हेरियंट अतिशय संसर्गजन्य आहे, पण धोकादायक नाही. मात्र, यामुळे कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.राज्यातील रुग्णसंख्या ही 110 वर पोहचली असल्याची माहिती समोर येतेय. त्यामुळे या व्हेरियंटचा राज्यात झपाट्याने फैलाव होत असल्याचं चित्र आहे. तसेच राज्यात गुरुवार 4 जानेवारी रोजी कोरोनामुळे 2 जणांचा मृत्यू झाला.आज 171 नव्या कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आलीये तर 117 रुग्ण कोरोनामुक्त झालेत.

# मी फक्त उभं राहून टाळ्या वाजवू का?

## » राम मंदिर प्राणप्रतिष्ठापणेत जाणार नाही : शंकराचार्य

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अयोध्येमध्ये 22 जानेवारी रोजी राम मंदिराचे (RAM MANDIR) उद्घाटन होणार आहे. रामलल्ला प्राण प्रतिष्ठापणा सोहळ्याची तयारी जोरात सुरू आहे. पंतप्रधान मोदी (PM MODI) यांच्या हस्ते प्राण प्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. तर, दुसरीकडे या सोहळ्यासाठी राम मंदिर ट्रस्टकडून आमंत्रणं पाठवण्यात येत आहेत. याच दरम्यान पुरीचे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद (PURI SHANKARACHARYA NISCHALANANDA) यांनी महत्वाचं वक्तव्य केले आहे. आपण राम मंदिर प्राण प्रतिष्ठापणा कार्यक्रमात उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदी हे प्रभू श्रीरामाच्या मूर्तीला स्पर्श करणार आणि मी तिथं उभं राहून टाळ्या वाजवणार? हे शिष्टाचाराच्या विरोधात असल्याचे त्यांनी म्हटले.**



दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शंकराचार्य निश्चलानंद रतलाम येथे पोहोचले होते. यावेळी त्यांनी प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात सहभागी होता येणार नसल्याचे सांगितले. आपल्या पदाच्या प्रतिष्ठेची जाणीव आहे, त्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. शंकराचार्य निश्चलानंद म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी रामललाच्या मूर्तीला हात लावणे शिष्टाचाराच्या विरोधात आहे. अशा स्थितीत तो मर्यादा पुरुषोत्तम यांच्या प्रतिष्ठेचा भंग झाल्याचे साक्षीदार होऊ शकत नाही. ते म्हणाले, राम मंदिरातील मूर्तीचा अभिषेक हा धर्मग्रंथानुसारच झाला पाहिजे. शंकराचार्य निश्चलानंद यांनी सांगितले की, त्यांना निमंत्रण मिळाले आहे. त्यावर लिहिले आहे की ते फक्त एकाच व्यक्तीसोबत कार्यक्रमाला येऊ शकतात. याशिवाय त्याच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क झाला नसल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, यामुळेच मी कार्यक्रमाला जाणार नाही. राम मंदिरावर ज्या प्रकारचे राजकारण केले जात आहे, तसे होऊ नये, असेही ते म्हणाले. सध्या राजकारणात काहीही योग्य नाही. धार्मिक स्थळांवर उभारल्या जाणाऱ्या कॉरिडॉरवरही निश्चलानंद यांनी टीका केली. ते म्हणाले, आज धार्मिक स्थळांना पर्यटन स्थळ बनवले जात आहे. अशा प्रकारे त्यांच्यात उपभोग आणि चैनीच्या गोष्टी जोडल्या जात आहेत, जे योग्य नाही. यादरम्यान त्यांनी इस्लामबाबतही मोठे वक्तव्य केले. प्रेषित मोहम्मद असोत की येशू ख्रिस्त असो या सर्वांचे पूर्वज सनातनी होते, असे वक्तव्यही त्यांनी केले. पंतप्रधान मोदींना श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमात प्रमुख यजमान म्हणून आमंत्रित केले आहे. अशा परिस्थितीत पंतप्रधान रामललाची मूर्ती स्वतःच्या हाताने गर्भगृहात गादीवर बसवण्याची शक्यता आहे. शंकराचार्य निश्चलानंद यांनी ट्रस्टच्या या निर्णयाचा निषेध व्यक्त केला आहे. दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शंकराचार्य निश्चलानंद रतलाम येथे पोहोचले होते. यावेळी त्यांनी प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात सहभागी होता येणार नसल्याचे सांगितले. आपल्या पदाच्या प्रतिष्ठेची जाणीव आहे, त्यामुळे कार्यक्रमाला उपस्थित न राहण्याचा निर्णय घेतल्याचे ते म्हणाले. शंकराचार्य निश्चलानंद म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी रामललाच्या मूर्तीला हात लावणे शिष्टाचाराच्या विरोधात आहे. अशा स्थितीत तो मर्यादा पुरुषोत्तम यांच्या प्रतिष्ठेचा भंग झाल्याचे साक्षीदार होऊ शकत नाही. दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी शंकराचार्य निश्चलानंद रतलाम येथे पोहोचले होते.

### सध्या राजकारणात योग्य नाही

» शंकराचार्य निश्चलानंद यांनी सांगितले की, त्यांना निमंत्रण मिळाले आहे. त्यावर लिहिले आहे की ते फक्त एकाच व्यक्तीसोबत कार्यक्रमाला येऊ शकतात. याशिवाय त्याच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क झाला नसल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, यामुळेच मी कार्यक्रमाला जाणार नाही. राम मंदिरावर ज्या प्रकारचे राजकारण केले जात आहे, तसे होऊ नये, असेही ते म्हणाले. सध्या राजकारणात काहीही योग्य नाही. धार्मिक स्थळांवर उभारल्या जाणाऱ्या कॉरिडॉरवरही निश्चलानंद यांनी टीका केली. ते म्हणाले, आज धार्मिक स्थळांना पर्यटन स्थळ बनवले जात आहे. अशा प्रकारे त्यांच्यात उपभोग आणि चैनीच्या गोष्टी जोडल्या जात आहेत, जे योग्य नाही. यादरम्यान त्यांनी इस्लामबाबतही मोठे वक्तव्य केले. प्रेषित मोहम्मद असोत की येशू ख्रिस्त असो या सर्वांचे पूर्वज सनातनी होते, असे वक्तव्यही त्यांनी केले.

# सोनिया निवडणूक लढवणार नाही

## » प्रियांका गांधी निवडणूक लढवतील का?

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आगामी लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधकांकडून धक्कातंत्राचा वापर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यात उमेदवाराच्या निवडीपासून ते प्रचाराचाही समावेश आहे. काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी (SONIA GANDHI) या रायबरेलीतून (RAEBARELI) निवडणूक लढवणार नसल्याची चर्चा सुरू झाली आहे. तेलंगणा प्रदेश काँग्रेसने केलेल्या ठरावावरून ही चर्चा सुरू झाली आहे. सोनिया गांधी यांनी तेलंगणातून निवडणूक लढवावी असा ठराव करण्यात आला आहे.**




तेलंगणातील मेडक मतदारसंघातून सोनिया गांधी निवडणूक लढवू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनीही याच जागेवरून निवडणूक लढवली होती. सोनिया गांधींनी तेलंगणातून निवडणूक लढवावी, असा ठराव आम्ही मंजूर केल्याचे काँग्रेस नेते मधु यक्षी गौर यांनी सांगितले. सोनिया गांधी यांनी तेलंगणातून निवडणूक लढवल्यास त्याचा फायदा संपूर्ण दक्षिण भारतात काँग्रेस-इंडिया आघाडीला होईल, असेही त्यांनी म्हटले. सोनिया गांधी सध्या उत्तर प्रदेशातील रायबरेलीच्या खासदार आहेत. रायबरेली ही जागा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे. गेल्या चार निवडणुकांत सोनिया येथून विजयी होत आहेत. येथील प्रत्येक निवडणुकीत त्यांना 50 टक्क्यांहून अधिक मते मिळाली आहेत. ही जागा ऐतिहासिकदृष्ट्या काँग्रेसकडेच आहे. देशात आतापर्यंत झालेल्या 17 लोकसभा निवडणुकांमध्ये 3 निवडणुका वगळता ही जागा प्रत्येक वेळी काँग्रेसकडे आहे. देशाच्या 72 वर्षांच्या निवडणूक इतिहासात उत्तर प्रदेशची रायबरेली ही जागा 66 वर्षांपासून काँग्रेसकडे आहे. तेलंगणा काँग्रेसने केलेल्या ठरावावर अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. जर सोनिया गांधींनी रायबरेलीची जागा सोडली तर त्यांची मुलगी आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी या जागेवरून निवडणूक लढवतील का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अलीकडेच प्रियंका गांधी आणि राहुल गांधी यांना उत्तर प्रदेशातून निवडणूक लढवण्याचे आवाहन केले होते. 2019 च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधींना अमेठीतून पराभवाला सामोरे जावे लागले होते. राहुल गांधी या मतदारसंघातून तीनदा खासदार झाले आहेत. राहुल गांधी यावेळी अमेठीतून निवडणूक लढवणार की नाही, याबाबत काँग्रेसने अद्याप काहीही स्पष्ट केले नाही.

# भारत जोडो न्याय यात्रे'चा मार्ग ठरला!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

लोकसभा निवडणुकांसाठी राहुल गांधी त्यांची भारत न्याय यात्रा सुरु करणार आहेत. 14 जानेवारीपासून राहुल गांधींच्या या यात्रेला सुरुवात होईल. तसेच राहुल गांधींच्या या यात्रेचं नावं देखील बदलण्यात आलं असून या आता या यात्रेचं नाव भारत जोडो न्याय यात्रा होणार आहे. याबाबत काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी दिलीये. या यात्रेची सुरुवात मणिपूरपासून होणार असून मुंबईत शेवट होईल. 14 जानेवारी रोजी दुपारी 12 नंतर या यात्रेला राहुल गांधी सुरुवात करतील. या यात्रेला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे हिरवा झेंडा दाखवणार आहेत. तसेच राहुल गांधी हे या यात्रेदरम्यान सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्यायविषयांवर आपले विचार लोकांसमोर मांडणार असल्याचं जयराम रमेश यांनी ट्विट करत म्हटलं आहे. 6,700 किलोमीटर लांबीचा हा प्रवास 15 राज्यांमधून जाणार आहे. या काळात राहुल गांधी बस आणि पायी प्रवास करणार आहेत. या यात्रेत इंडिया आघाडीच्या मित्रपक्षांना देखील आमंत्रित करण्यात येईल. भारत जोडो न्याय यात्रेअंतर्गत राहुल गांधी 67 दिवसांत 6713 किमीचा प्रवास करणार असल्याची माहिती काँग्रेस नेत्यांकडून देण्यात आलीये. ही यात्रा 15 राज्यांतील 110 जिल्ह्यांतून जाणार आहे. लोकसभेच्या 100 जागा या अंतर्गत येतील. राहुल गांधींच्या या यात्रेची मुंबईत होईल. 107 किमीच्या प्रवासात मणिपूरमध्ये 4 जिल्हे समाविष्ट केले जातील. नागालँडमध्ये ही यात्रा 257 किमी अंतर कव्हर करेल आणि 5 जिल्ह्यातून जाईल.

# 'मेरी ख्रिसमस' मधील 'नजर तेरी तुफान' गाणं रिलीज

अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) आणि विजय सेतुपती (VIJAY SETHUPATHI) यांचा 'मेरी ख्रिसमस' (MERRY CHRISTMAS) हा चित्रपट रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी रिलीज झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. आता या चित्रपटातील 'नजर तेरी तुफान' हे गाणे रिलीज झाले आहे. या गाण्यात कतरिना कैफ आणि विजय थलपथी यांच्या रोमँटिक अंदाजानं प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. 'मेरी ख्रिसमस' या चित्रपटातील 'नजर तेरी तुफान' हे दुसरे गाणे रिलीज झाले आहे. 'मेरी ख्रिसमस'या चित्रपटाचं टायटल ट्रॅक काही दिवसांपूर्वी रिलीज झालं होतं. त्याला प्रेक्षकांची पसंती मिळाली. आता 'नजर तेरी तुफान' या गाण्याला देखील प्रेक्षकांची विशेष पसंती मिळत आहे. या गाण्याला प्रीतम चक्रवर्ती यांनी संगीतबद्ध केले आहे. तर पॅपोननं हे गाणं गायलं आहे. गाण्यामधील कतरिना आणि विजय यांच्या 'लिपलॉक' सीननं अनेकांचे लक्ष वेधलं आहे. तसेच कतरिना आणि विजयचा रोमँटिक अंदाज या गाण्यात दिसत आहे.'नजर तेरी तूफान' या गाण्याचा गीतकार वरुण ग्रोवर आहे. कतरिना कैफ आणि विजय सेतुपती यांचा मेरी ख्रिसमस हा चित्रपट 12 जानेवारीला रिलीज होणार आहे. मेरी ख्रिसमस या चित्रपटात कतरिना आणि विजय यांची ऑनस्क्रिन केमिस्ट्री पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत. या चित्रटात संजय कपूर, विनय पाठक, प्रतिमा काझमी, टिनू आनंद, अश्विनी काळसेकर आणि राधिका आपटे हे कलाकार देखील महत्वाची भूमिका साकारणार आहेत. राधिका आपटे आणि अश्विनी काळसेकर या चित्रपटात कॅमिओ भूमिका करताना दिसणार आहेत. 'मेरी ख्रिसमस' या चित्रपटाची कथा ख्रिसमसच्या संध्याकाळी दोन अनोळखी व्यक्तींच्या भेटीवर आधारित आहे. 'मेरी ख्रिसमस'या चित्रपटाचे दिग्दर्शन श्रीराम राघवन (SRIRAM RAGHAVAN) यांनी केले आहे. या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.



अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) आणि विजय सेतुपती यांचा 'मेरी ख्रिसमस' (MERRY CHRISTMAS) हा चित्रपट रिलीज होण्यासाठी सज्ज आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी रिलीज झाला.

## शत्रूवरही अशी वेळ येऊ नये : सुप्रिया पाठारे

मराठी मालिका आणि चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री सुप्रिया पाठारे (SUPRIYA PATHARE) आणि तिचा मुलगा मिहीर पाठारे यांनी काही महिन्यांपूर्वी महाराज फास्ट फूड कॉर्नर या नावाच्या रेस्टॉरंट सुरु केलं. त्यांच्या या रेस्टॉरंटला खवय्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पण काही कारणांमुळे हे हॉटेल काही दिवसांसाठी बंद करण्यात आलं होतं. अशताच हॉटेल बंद असताना कोणकोणत्या संकटांना समोरं जावं लागलं? याबद्दल सुप्रियानं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. आता महाराजा हॉटेलला सुरुवात झाली आहे. पण दोन महिने हॉटेल बंद होतं. त्याचा बराच परिणाम झाला. कॅन्सरमुळे माझी आई गेली तसेच बरेच एकामोगून प्रसंग एक येत गेले. पहिल्यांदा हॉटेल जेव्हा बंद झालं तेव्हा स्टाफचं निघून गेला. मी नवीन हॉटेल सुरु करणाऱ्यांना

## जनाईच्या लूकनं वेधलं लक्ष



प्रसिद्ध गायिका आशा भोसले (ASHA BHOSLE) यांनी अनेक हिट चित्रपटांमधील गाणी गायली आहेत. अशा भोसले यांना 'मेलोडी क्वीन' असंही म्हटलं जातं. आशा भोसले या त्यांच्या गाण्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकतात. त्या अनेक कार्यक्रमांना देखील हजेरी लावतात. नुकत्याच आशा भोसले या त्यांच्या नातीसोबत एका कार्यक्रमामध्ये स्पॉट झाल्या. यावेळी अनेक पापाराझींनी त्यांचे फोटो काढले. आशा भोसले यांच्यासोबत त्यांची नात जनाई भोसले (ZANAI BHOSLE) हिचे देखील फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जनाईच्या सौंदर्यानं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओमध्ये जनाई ही मोकळे केस, साडी आणि मोत्यांचे गळ्यातले अशा लूकमध्ये दिसत आहे. तर आशा भोसले या ऑफ व्हाइट कलरची साडी आणि मोत्यांची ज्वेलरी अशा लूकमध्ये दिसत आहेत. जनाई आणि आशा भोसले यांच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन जनाईच्या सौंदर्याचं कौतुक केलं आहे. जनाई ही आशा भोसले यांचा मुलगा आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई ही तिच्या आजीप्रमाणेच गायिका आहे. ती सोशल मीडियावर तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ शेअर करत असते.

## अबरार गया नही जिंदा है!

रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेला आणि संदीप रेड्डी वांगाचे दिग्दर्शन असलेला ॲनिमल हा गेल्या वर्षातील सर्वाधिक चर्चा झालेला एक लोकप्रिय चित्रपट होता. त्यानं बॉक्स ऑफिसवर मोठी कमाई केल्याचे दिसून आले. त्याचं जेवढं कौतुक झालं तेवढीच त्याच्यावर मोठ्या प्रमाणात टीकाही करण्यात आली होती. रणबीर कपूर, रश्मिका मंदाना, बॉबी देओल, अनिल कपूर यांची देखील या चित्रपटामध्ये महत्वाची भूमिका होती. या सगळ्यात बॉबी देओलनं जी नकारात्मक व्यक्तिरेखा साकारली होती त्याचे कौतुक झाले होते. ती भूमिका पाहून नेटकऱ्यांनी, प्रेक्षकांनी बॉबीविषयी दिलेल्या प्रतिक्रिया देखील खूप काही सांगून जाणाऱ्या आहेत. लॉर्ड बॉबी हा सोशल मीडियावर खूपच लोकप्रिय असणारा सेलिब्रेटी आहे. ॲनिमलमध्ये रणबीर कपूर जेवढा लोकप्रिय झाला त्यापेक्षा बॉबीची क्रेझ जास्त असल्याचे दिसून आले. पहिल्या पार्ट मध्ये तो रणबीरच्या हातून मारला जातो. ते पाहिल्यानंतर बॉबीच्या चाहत्यांची निराशा झाली होती. मात्र आता ॲनिमलबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. ॲनिमलनंतर त्याच्या सिक्वेलची चर्चा होताना दिसत आहे. त्यामध्ये देखील बॉबी देओल दिसणार असल्याचे बोलले जात आहे. आणि पुन्हा त्यात बॉबी देओलही वेगळ्या भूमिकेत चमकणार आहे. अशी चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. यापूर्वी यावरुन वेगवेगळ्या चर्चांना उधाणी आले होते. २०२३ मध्ये वर्ल्ड वाईड ॲनिमलनं तब्बल ९०० कोटींचा बिझनेस केल्याचे दिसून आले.

## यश सोबत दिसणार बॉलीवूडची करिना?



सध्या साऊथ सिनेमांची चांगलीच हवा आहे. टॉलिवूड सिनेमे सुपर हिट होत असून आता हळू हळू बॉलिवूड स्टारही साऊथची वाट धरत आहेत. किंग खान म्हणजेच शाहरुख खानने देखील आता साऊथचा दिग्दर्शक ॲटलीसोबत जवानमध्ये काम केले. तर आता अभिनेत्री करिना कपुरही दक्षिणेकडे वळणार आहे. आता करीना कपूर खानही तिच्या साऊथ डेब्यूसाठी सज्ज झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहे. मिडिया रिपोर्टमध्ये असा दावा करण्यात येत आहे. तर आता करिना 'KGF' आणि 'KGF CHAPTER 2' सारखे सुपरहिट सिनेमे देणारा कन्नड सुपरस्टार यशसोबत काम करणार आहे. कन्नड सुपरस्टार यशसोबत करीना कपूर काम करणार असल्याच्या चर्चांमुळे दोघांचे चाहते उत्सुक आहेत. साऊथचा सुपरस्टार यश सध्या त्याच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. तो आता टॉक्सिक या चित्रपटात दिसणार आहे. आता यशाच्या 'टॉक्सिक'मध्ये करिना मुख्य भूमिकेसाठी दिसणार आहेत. तर निर्मातेही करिनासोबत काम करण्यास उत्सुक आहेत. इंडिया टुडेनुसार, यश आणि चित्रपटाचे निर्माते 'टॉक्सिक' साठी अशा अभिनेत्रीच्या शोधात होते जी केवळ प्रोजेक्टचा भाग होणार नाही तर प्रेक्षकांना आकर्षित करेल. त्यामुळे यासाठी करिना कपुरच्या नावाची चर्चा आहे. करिनाने 'टॉक्सिक' सिनेमास होकार दिल्यास हा तिचा पहिला साऊथ सिनेमा असेल. गीतू मोहनदास दिग्दर्शित हा चित्रपट 10 एप्रिल 2025 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# न्यूलँड्सच्या खेळपट्टीवरही भेगा

## » खेळपट्टीवरून कॅप्टन रोहितचं त्यांच्याच भाषेत उत्तर!

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील केपटाऊन कसोटी पाच सत्रात संपल्यानंतर भारतीय कर्णधाराने सामनाधिकारी आणि आयसीसीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. रोहित शर्माने खेळपट्ट्यांच्या रेटिंगच्या बाबतीत आयसीसी आणि सामनाधिकारी यांच्यावर दुटप्पीपणाचा ठपका ठेवला आहे. खेळाच्या इतिहासातील सर्वात लहान कसोटी जिंकल्यानंतर रोहित म्हणाला की, वेगवान गोलंदाजांना आवश्यकतेपेक्षा जास्त मदत करणारी खेळपट्टी दिल्याबद्दल धन्यवाद. यासोबतच भारताच्या फिरकी खेळपट्ट्यांवर होत असलेल्या टीकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.**




सामन्यानंतर बोलताना रोहित शर्मा म्हणाला की, “विश्वचषक २०२३ च्या फायनल सामन्याच्या खेळपट्टीला सरासरीपेक्षा कमी रेटिंग देण्यात आले होते, तरीही तिथे विरोधी संघाच्या फलंदाजाने शतक झळकावले होते. मी सामनाधिकाऱ्यांना विनंती करतो की, ज्या देशात ती स्पर्धा खेळली गेली होती, तिथे काय नाही ते पहा. भारतातील पहिल्याच दिवशी उडणाऱ्या धुळीबद्दल बोलायचे झाले, तर न्यूलँड्सच्या खेळपट्टीवरही भेगा पडल्या होत्या. रोहित शर्मा पुढे म्हणाला, “जेव्हा आमच्यासमोर असे आव्हान असते, तेव्हा तुम्ही येता आणि त्याचा सामना करत. भारतातही असेच घडते, परंतु, जर भारतात पहिल्याच दिवशी खेळपट्टी फिरकीला साथ द्यायला लागली, तर लोक उडणाऱ्या धुळीबद्दल बोलायला सुरुवात करतात. आता या खेळपट्टीवर खूप भेगा पडलेल्या आहेत त्याकडे लक्ष दिले जात नाही.” रोहितने सामनाधिकाऱ्यांनी गेल्या वर्षी भारतात झालेल्या विश्वचषकातील खेळपट्ट्यांना दिलेल्या काही रेटिंगवरही प्रतिक्रिया दिली. रोहित म्हणाला, “मला वाटते की आपण जिथेही जातो तिथे तटस्थ राहणे महत्त्वाचे आहे. विशेषत: सामनाधिकाऱ्यांनी रहावे. तुम्हाला माहिती आहे की, यापैकी काही सामनाधिकाऱ्यांना ते खेळपट्ट्यांचे मूल्यांकन कसे करतात यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कारण हे खूप महत्त्वाचे आहे. रोहित शर्मा पुढे म्हणाला, “मला अजूनही विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील खेळपट्टीला सरासरीपेक्षा कमी रेटिंग दिले गेले, यावर विश्वास बसत नाही. अंतिम सामन्यात एका विरोधी संघाच्या फलंदाजाने शतक झळकावले. ती खेळपट्टी खराब कशी असू शकते? या त्या गोष्टी आहेत, ज्यावर आयसीसी आणि सामनाधिकारी यांनी खेळपट्टीला रेटींग देताना ती खेळपट्टी कोणत्या देशातील आहे, हे न पाहता खेळपट्टीची पाहणी करुन त्यावर आधारित त्यांना रेटिंग द्यावे. मला आशा आहे की ते त्यांचे कान उघडे ठेवतील, ते डोळे उघडे ठेवतील आणि खेळाच्या त्या पैलूंकडे पाहतील. खरे सांगायचे तर मी अशा खेळपट्ट्यांच्या बाजूने आहे. अशा खेळपट्ट्यांवर आम्हाला आव्हान द्यायचे आहे. आम्हाला न्यूलँड्सच्या खेळपट्टीवर खेळल्याबद्दल अभिमान आहे. पण मला एवढेच सांगायचे आहे की, तटस्थ रहा. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरी आणि अंतिम कसोटी दोन दिवसात संपली. भारताने हा सामना 7 विकेटने जिंकून दोन सामन्यांच्या मालिकेत 1-1 अशी बरोबरी केली. दक्षिण आफ्रिकेच्या भूमीवर भारताला मालिका अनिर्णित ठेवण्याची ही केवळ दुसरी वेळ आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बमुराहने 61 धावांत 6 बळी घेत दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्या डावात 176 धावांत रोखले. भारताला विजयासाठी 79 धावांचे लक्ष्य मिळाले होते, जे त्याने 12 षटकात 3 गडी गमावून 80 धावा करून पूर्ण केले. पहिली कसोटी एक डाव आणि 32 धावांनी गमावल्यानंतर भारताने या सामन्यात शानदार पुनरागमन केले आणि दोन दिवसांतच सामना जिंकला. कसोटी इतिहासातील हा सर्वात लहान सामना ठरला. रोहित शर्मा म्हणाला की, जोपर्यंत प्रत्येकजण भारतात तोंड बंद ठेवतो आणि भारतीय खेळपट्ट्यांबद्दल तक्रार करत नाही.

### शर्माने विजयाला ग्रेट म्हटले

» या विजयासह एमएस धोनीच्या विक्रमाची बरोबरी केल्यानंतर रोहित शर्मा खूप आनंदी दिसत होता. ऐतिहासिक केपटाऊन कसोटी जिंकल्यानंतर तो म्हणाला की, ही एक मोठी उपलब्धी आहे. सेंच्युरियनमध्ये आम्हाला चुकांमधून शिकावे लागले. आम्ही खूप चांगले पुनरागमन केले, विशेषतः आमचे गोलंदाज. काही योजना केल्या आणि संघाला बक्षीस मिळाले. आम्ही योजना व्यवस्थित राबवली. आम्ही चांगली फलंदाजी करत 100 धावांची आघाडी घेतली. सेंच्युरियन कसोटीत भारताचा एका डावाने पराभव झाला. यानंतर टीम इंडियावर बरीच टीका झाली. आता टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेला पहिल्या डावात केवळ 55 धावांवर रोखून दमदार कामगिरी करत केपटाऊनमध्ये पहिल्यांदाच विजय मिळवला. धावा न करता 6 विकेट गमावण्याबाबत तो म्हणाला की, शेवटच्या सहा विकेट्स बघून आनंद झाला नाही. आम्हाला माहित होते की हा एक छोटासा सामना असणार आहे. धावा महत्त्वाच्या आहेत हे आम्हाला माहीत होते. त्यामुळे आघाडी मिळणे अत्यंत गरजेचे होते.

# स्टंपिंग तपासताना पंच यापुढे झेल तपासणार नाहीत

## » आयसीसीने स्टंपिंग आणि कन्कशनच्या नियमात केला बदल

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवीन वर्षाच्या मुहूर्तावर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) खेळाच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत. या बदलांनंतर, खेळाडू नियमांचा वापर करून अयोग्य फायदा घेऊ शकणार नाहीत. स्टंपिंगबाबत आयसीसीने सर्वात मोठा नियम बदलला आहे. यासंबंधीचे रिव्ह्यू आता फक्त साइड-ऑन कॅमेरे पाहूनच घेतले जातील.**

याचा अर्थ स्टंपिंगबाबतचे अपील जेव्हा थर्ड अंपायरपर्यंत पोहोचते, तेव्हा ते चेंडू बॅटला लागला की नाही हे पाहणार नाहीत. ते फक्त स्टंपिंगबाबतच निर्णय देतील. आयसीसीने बदललेले नियम १२ डिसेंबर २०२३ पासून लागू झाले आहेत. जर एखाद्या संघाला स्टंपिंग प्रक्रियेत कॅच-बिहाइंड तपासायचे असेल, तर त्याला आता कॅच-बिहाइंड अपीलसाठी वेगळा डीआरएस पर्याय वापरावा लागेल. गेल्या वर्षीच्या सुरुवातीला भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत, ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरीने संघाचा



डीआरएसचा पर्याय न वापरता यष्टीमागे झेल घेतल्याबद्दल रिव्ह्यू वापरला होता. आयसीसीच्या नवीन दुरुस्तीमध्ये असे म्हटले आहे की, “नवीन नियम स्टंपिंगचे रिव्ह्यू केवळ स्टंपिंगच्या तपासणीपुरते मर्यादित करते, त्यामुळे क्षेत्ररक्षण संघाला रिव्ह्यूदरम्यान इतर कोणत्याही पद्धतीने फलंदाज बाद आहे का नाही तपासणीसाठी मोफत रिव्ह्यू मिळणार नाहीत. नियमांमधील या सुधारणा 12 डिसेंबर 2023 पासून लागू झाल्या आहेत. स्टंप आऊट तपासादरम्यान एखाद्या संघाला विकेटच्या मागे झेलसाठी रेफरल घ्यायचे असेल तर त्याला वेगळा डीआरएस घ्यावा लागेल. स्टंपिंग तपासताना पंच यापुढे झेल तपासणार नाहीत. गेल्यावर्षी, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मालिकेदरम्यान, ऑस्ट्रेलियन यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरीने देखील डीआरएसचा वापर न करता स्टंपिंग केल्यावर विकेटच्या मागे झेल घेण्यासाठी रेफरलचा वापर केला होता. मात्र, आता नवीन नियम लागू झाल्यानंतर स्टंपिंगसाठी अपीलमध्ये केवळ बाजूचे फुटेज ऑन कॅमेरा दाखवले जाणार आहे. पंच फक्त त्याकडे पाहतील.

### रिप्लेसमेंट नियमांमध्ये देखील बदल

» कन्कशन रिप्लेसमेंट नियमांमध्येही अधिक स्पष्टता आणली आहे. दुखापत झालेल्या गोलंदाजी करण्यापासून निलंबित केले असल्यास, त्याच्या बदली खेळाडूला गोलंदाजी करण्याची परवानगी दिली जाणार नाही. दुखापतींचे मूल्यांकन आणि उपचारासाठी दिलेला वेळ चार मिनिटांपर्यंत मर्यादित केला आहे.